


# मुंबईतील विविध स्त्रीसंस्थांचे मुख्य मंत्र्यांना मागणी निवेदन

आम्ही मुंबईतील विविध स्त्री संस्थांच्या प्रतिनिधी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने निघालेल्या स्त्रियांच्या मोर्चातर्फे खालील मागण्या आपल्यासमोर मांडीत आहोत.

१) महाराष्ट्राच्या प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याची सोय झालीच पाहिजे. पिण्याच्या पाण्याची सोय नसेल तर गावातील महिलांना त्याचा सर्वांत जास्त उपद्रव होतो कारण रोजच्या घरसंसारासाठी लागणारे पाणी त्यांना लांबून आणावे लागते.

आमची अशी मागणी आहे की हे काम महाराष्ट्र शासनाने अग्रक्रमाने हाती घ्यावे व पुढील एक वर्षात ते पूर्ण करण्याकरिता आपण काय करीत आहात याची माहिती द्यावी.

आज रोजगार हमीच्या कामवर मोठ्या संख्येने स्त्रिया काम करीत आहेत. तेथे प्रत्यक्ष कामावरही अनेक ठिकाणी पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसते अशा तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. याबाबतही तातडीने लक्ष घालून अपुरी व्यवस्था असेल तेथे त्यांना पाण्याची व्यवस्था करावी.

२) पाळणाघरे– महाराष्ट्रात नोकरी कामधंदा करणाऱ्यास्त्रियांची संख्या झपाट्याने वाढत आहे. तसेच समाजव्यवस्थेत एकत्रित कुटुंबपद्धती ऐवजी विभक्त कुटुंबपद्धती रूढ होत आहे अशा वेळी आपल्या पोटापाण्याच्या व्यवसायासाठी घराबाहेर बराच काळ जावे लागत आहे अशा स्त्रियांच्या मुलांच्या देखभालीसाठी व्यवस्था करणे हे मात्र इतकेच समाजाचे व शासनाचे कर्तव्य आहे.

नोकरी व्यवसाय करणाऱ्यांमध्ये शहरांतील उद्योगधंद्यांत कारखान्यांतील कामगार स्त्रियांसाठी फॅक्टरी ॲक्टमधील कलमाप्रमाणे स्त्रिया कामावर असतील तर पाळणाघराची सोय करण्याचे कायदेशीर बंधन मालकांवर आहे. प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी अत्यंत कमी प्रमाणात होते. मुंबईसारख्या मोठ्या शहरात कारखान्याला लागून पाळणाघराची व्यवस्था असली तरी व्यवहारात कामाच्या ठिकाणी मुलांना घेऊन जाणे केवळ अशक्य आहे. याचा फायदा कारखानदार बरोबर घेतात व पाळणाघर ठेवण्याच्या जबाबदारीतून मुक्त होऊ पाहतात.

कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांबरोबर आता कचेरीत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या खूप मोठी आहे. केंद्र सरकारी, राज्य सरकारी, निमसरकारी संस्था, खाजगी संस्था, शिक्षण संस्था अशा अनेक प्रकारच्या कचेरीत काम करणारा स्त्रियांचा मोठा वर्ग आहे. त्यांच्या मुलांच्या संगोपनाची आज कोणतीच व्यवस्था नाही. याशिवाय शहरातील लहान उद्योगांतील असंघटित स्त्री कामगार, घरकाम करणाऱ्या स्त्रिया आदि स्त्रियांचीही अडचण आहे.

ग्रामीण भागातील शेतमजूर स्त्रिया, मार्केटींग फेड-

योजनेमध्ये काम करणाऱ्या स्त्रिया व रोजगार हमी-वरील स्त्रिया या सर्वांनाच पाळणाघराची जरुरी आहे. कापूस, तंबाखू इत्यादी वखारीत, कारखान्यांत, जिनिंग प्रेसिंग इ. कामावर असलेल्या स्त्रियांची मुले तर आई-बरोबर दूषित हवेत संपूर्ण दिवस वावरत असतात. या सर्वांची काही व्यवस्था करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. पुढील पिढीच्या आरोग्याच्या दृष्टीने हे अत्यावश्यक आहे.

रोजगार हमीवर जवळजवळ ८०% स्त्रिया आहेत. त्यांच्या मुलांकरिता कामाच्या ठिकाणी पाळणाघराची व्यवस्था करण्याचे पुलोद शासनाने मंजूर करून त्या प्रमाणे काही प्रमाणात अंमलबजावणीही सुरू केली होती. त्याची पूर्णपणे सर्वत्र अंमलबजावणी व्हावी म्हणून आमची मागणी आहे की–

अ) शहरी भागाकरिता वसाहतीमध्ये भागाभागांत पाळणाघरे उघडण्यासाठी शासनाने जागा, इमारत उपलब्ध करून द्यावी. पाळणाघर चालविण्यासाठी आर्थिक मदत द्यावी. स्थानिक स्त्री संस्था पाळणा-घराची व्यवस्था पाहण्यास मदत करतील. या करिता महाराष्ट्र गृहनिर्माण वसाहती व राज्य सरकारच्या वसाहती येथे ताबडतोब जमीन उपलब्ध होऊ शकेल.

ब) केंद्र सरकारच्या वसाहतीत जागा उपलब्ध करून पाळणाघर चालविण्यास केंद्रशासनाला आग्रह करावा.

क) सर्व औद्योगिक वसाहतीत किमान एक–दोन दोन पाळणाघरे बांधण्याची सक्ती उद्योगधंद्यांना करावी.

ड) ग्रामीण भागात प्राथमिक शाळांना जोडून पाळणाघरे असावीत म्हणजे धाकटया भावंडांना सांभाळण्यासाठी घरी राहणाऱ्या मुलांची शाळा बुडणार नाही व शिक्षण अर्धवट सोडणाऱ्या मुला-मुलींची संख्या कमी होऊ शकेल.

इ) रोजगार हमीच्या कामाच्या ठिकाणी मंडप इ. सोय करून कामावर येणाऱ्या स्त्रियांपैकी वयस्क महिलांवरती मुलांना सांभाळण्याची जबाबदारी सोप-वावी व सर्व कामावर पाळणाघराची अशी व्यवस्था करावी.

आजपर्यंत महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक स्त्रियां-वरील अन्यायाचे निराकरण करण्यासाठी आयुष्य भर झगडले. त्यांच्या परंपरेचा आपण सर्वजण मोठ्या अभिमानाने उल्लेख करतो. त्या परंपरेला जागून आजच्या युगात निर्माण झालेली ही रोजगारावर जाणाऱ्या स्त्रीची निकड लक्षात घेऊन ही पाळणा-घराची व्यवस्था करण्याची जागरूकता दाखवण्याचा प्रथम मान महाराष्ट्राने मिळवावा असे आवाहन आम्ही आपणास करीत आहोत.

## महिलांच्या मागण्यांवर शासनाची प्रतिक्रिया मागणी

१) महाराष्ट्राच्या प्रत्येक गावात अग्रक्रमाने पिण्याच्या पाण्याची सोय झालीच पाहिजे कारण रोजच्या घर संसारासाठी लागणारे पाणी महिलांना लांबून आणावे लागते. महिलांना बऱ्याच लांबून पाणी आणावे लागत असल्यामुळे फारच त्रास होतो.

## अभिप्राय–ग्रामीण विकास विभाग :

सन १९८०–८५ या ६ व्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस राज्यातील एकूण ३५७३८ खेडयांपैकी १७११२ समस्याप्रधान गावांना पाणी उपलब्ध करण्याचे अंदाजिले होते. या पैकी ७४५८ गावांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. सन १९८२–८३ या आर्थिक वर्षात ३३७३ गावांना पिण्याचे पाणी पुर-विण्याचे प्रस्तावित केलेले आहे. ६२८१ गावे सन १९८३–८४ व १९८४–८५ या दोन वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे, ६ व्या पंचवार्षिक योजनेत या कामासाठी एकूण ३३० कोटी रुपयाची तरतूद प्रस्ता-वित केलेली आहे.

सन १९८४–८५ अखेर एकूण १७११२ खेडयांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देता येईल.

**मागणी क्रमांक** २ : रोजगार हमीच्या कामावर मोठ्या संख्येने स्त्रिया कामावर आहेत. तेथे प्रत्यक्ष कामावर अनेक ठिकाणी पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसते अशा तक्रारी आहेत. या बाबतीत तातडीने लक्ष घालून अपुरी व्यवस्था असेल अशा ठिकाणी पुरेशा पाण्याची व्यवस्था करावी.

**अभिप्राय-नियोजन विभाग** : महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात १८ वर्षावरील जे स्त्री-पुरुष अंग मेहनत करायास तयार असतील त्यांना काम देण्याची कायदेशीर मी शासनाने दिलेली आहे. अशा कामावर काम रणाऱ्या मजुरांसाठी कामाच्या जागी शासनाने ाण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली आहे. या संबंधित ासनाने दिनांक १४–२–७५ च्या परिपत्रकाप्रमाणे ादेश दिलेले आहेत. कामावरील मजुरांना कामाच्या ागेवर पिण्याचे पाणी व त्यासाठी प्लॅस्टिकचे ग्लास ेच पाणी ठेवण्यासाठी लागणारी भांडी पुरविण्याची ावस्था केलेली आहे. पाणी वाटपासाठी एका व्यक्तीची तिदिन चार रुपये मजुरीवर नियुक्ती करण्याची ावस्था केली जाते. तसेच कामावर असणाऱ्या स्त्री जुरांच्या ३ वर्षाखालील मुलांना सांभाळण्यासाठी का बाईची प्रतिदीन चार रुपये मजुरीवर नियुक्तीरणे, दुपारच्या विश्रांतीसाठी निवाऱ्याची शेड तसेच ांना झोपण्यासाठी कापडाच्या साध्या पाळण्याची वधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. जर एखाद्या मावर अशा प्रकारची सुविधा उपलब्ध नसेल असे सनाच्या निदर्शनास आणून दिले तर तेथे तात्काळ ाण्याच्या पाण्याची व इतर सोय उपलब्ध करून देण्यात कार्यवाही केली जाईल.

**मागणी क्रमांक ३** : नोकरी व्यवसाय करणाऱ्यांमध्ये रांतील उद्योगधंद्यातील कारखान्यांतील कामगार ्यांसाठी कंपनी कायद्यातील कलमाप्रमाणे स्त्रिया ामावर असतील तर पाळणाघराची सोय करण्याचे ादेशीर बंधन मालकांवर आहे. प्रत्यक्षात या कायाी अंमलबजावणी अत्यंत कमी प्रमाणात होते.

**अभिप्राय–उद्योग ऊर्जा व कामगार विभाग** : महा- ् राज्यात एकूण १८५०० कारखाने आहेत पैकी ० कारखान्यांना कायद्यातील तरतुद लागू आहे. ुदीप्रमाणे ज्या कारखान्यामध्ये ३० पेक्षा जास्त कामगार कामावर असतील तरच त्यांच्या न मुलांना पाळणाघराची सोय करावयाची असते. े १५ टक्के कारखान्यांनी या तरतुदीची अंमलवणी केलेली आहे. शेकडा ६० टक्के कारखाने हे ागिक वसाहतीत वसलेले असल्यामुळे किंवा ा जागेमुळे पाळणाघराची सोय करू शकलेले नाहीत. शेकडा १५ टक्के कारखाने हे हंगामी असल्यामुळे पाळणाघराची सोय उपलब्ध करून देण्या बाबत त्यांच्यावर जबरदस्ती करता येत नाही. उरलेल्या १० टक्के कारखान्यात विवाहित महिला कामगारांची संख्या ही २० पेक्षा कमी असल्यामुळे त्या या तरतुदीतून त्यांना सूट देण्यात आलेली आहे. तरीपण सदरहू नियमात योग्य ते बदल करण्यात येत आहेत सन १९८१–८२ मध्ये १० कारखान्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाहीच्या सुचना दिलेल्या आहेत.

**मागणी क्रमांक ४** : शहरी भागाकरिता वसाहतीमध्ये भागा-भागात पाळणाघरे उघडण्यासाठी शासनाने जागा उपलब्ध करून द्यावी. याकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण वसाहती व राज्य सरकारच्या वसाहती इत्यादी ठिकाणी ताबडतोब जमीन उपलब्ध करून द्यावी.

**अभिप्राय–सामान्य प्रशासन विभाग** : नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी गृहनिर्माण वसाहतीत किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत पाळणाघरे उघडण्यासंबंधीची योजना नाही. परंतु अशा प्रस्तावावर विचार केला जाईल.

**मागणी क्रमांक ५** : ग्रामीण भागात प्राथमिक शाळांना जोडून पाळणाघरे असावीत, म्हणजे धाकट्या भावंडांना सांभाळण्यासाठी घरी राहणाऱ्या मुलांची शाळा बुडणार नाही व शिक्षण अर्धवट सोडणाऱ्या मुला-मुलींची संख्या कमी होऊ शकेल.

**अभिप्राय शिक्षण व सेवायोजन विभाग** : जेथे प्राथमिक शाळांना जोडून ज्या ठिकाणी बालवाड्या सुरू आहेत अशा प्राथमिक शालातील विकास वाड्यांयाची योजना सन १९७९–८० पासून कार्यान्वित केलेली आहे. या योजनेखाली आदिवासी उप-योजना क्षेत्रातील जिल्ह्यात २१ विकास वाड्या सुरू केलेल्या आहेत. प्रत्येक विकास वाडीत १० मुलांची सोय करण्यात येते. प्रत्येक मुलांमागे दुधासाठी महिन्याला २५ रुपयाचे अनुदान दिले जाते. मुलांना सांभाळण्यासाठी दरमहा ५० रुपयावर एका बाईची नियुक्ती केली जाते. तसेच पाळणा व इतर साहित्य विकत घेण्यासाठी प्रत्येक विकासवाडीला ५०० रुपयाचे अनुदान दिले जाते. ही योजना शिक्षण विभागामार्फत कार्यान्वित केली जाते.

**मृणाल गोरे**